ये

इंड
ाय
या
चे
चे
त
र्



**आळंदी :** एमआयटी आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये क्विक हिल साइबर वॉरियर क्लबच्या स्थापनेप्रसंगी उपस्थित तज्ज्ञ.

# ‘एमआयटी’ महाविद्यालयात सायबर वॉरियर क्लब स्थापन

**पिंपरी, ता. १९ :** आळंदी येथील एमआयटी आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजमध्ये क्विक हिल फाउंडेशनच्या सहकार्याने क्विक हिल सायबर वॉरिअर क्लबची स्थापना केली. फाउंडेशनसोबत सामंजस्य करार केला. फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर उपस्थित होत्या.

या उपक्रमाअंतर्गत ‘सायबर शिक्षणासाठी सायबर सुरक्षा’ मोहीम राबविण्यात येणार आहे. संगणक शास्त्राचे विद्यार्थी स्वयंसेवक असतील. शाळा व समाजात सायबर सुरक्षेविषयी ऑनलाइन आणि ऑफलाइन माध्यमांतून जनजागृती करतील. कॉम्प्युटर ॲप्लिकेशन विभागाचे प्रा. अमित ताले समन्वयक असतील. क्लबमध्ये अध्यक्ष हिंदवी खरमाळे, सचिव शिवप्रसाद जाधव, कार्यक्रम संचालक आयुष इचे, मीडिया संचालक मानस पाटील आणि २० विद्यार्थी सायबर वॉरियर असतील. फेब्रुवारी २०२६ पर्यंत त्यांचा कालावधी असेल. डॉ. विकास महांडुळे, प्रा. अक्षदा कुलकर्णी व संचालक डॉ. बी. बी. वाफरे यांचे सहकार्य लाभले. वाफरे म्हणाले, “सायबर वॉरियर क्लबमुळे जागरूकता निर्माण होईल आणि ते जबाबदार डिजिटल नागरिक म्हणून घडतील. हा उपक्रम डिजिटल साक्षरतेसाठी एक नवा आदर्श निर्माण करेल आणि विद्यार्थ्यांचे नेतृत्व व सामाजिक बांधिलकी यांना बळकटी देईल”